Government of Maharashtra
State Council of Educational Research & Training, Maharashtra
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020) 24476938, 24475571
Website : www.maa.ac.in

महाराष्ट्र शासन
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०)२४४७६९३८, २४४७५५७१
ईमेल: curriculumdept@maa.ac.in

जा.क्र/ राशैसंप्रपम/अविवि/ दिव्यांग मूल्यमापन योजना २०२०-२१ / ७० दि.०१.०१.२०२१.

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद (सर्व)

४) शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर /पश्चिम)बृहन्मुंबई

५) शिक्षण प्रमुख /शिक्षणाधिकारी /प्रशासनाधिकारी /महानगरपालिका (सर्व)

**विषय - विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके व मूल्यमापन योजना इत्यादींबाबत ...**

**संदर्भ** - १) राज्य मंडळ, पुणे कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./संशोधन/५२४२, दि.१५.१२.२०२०.
२)बालभारती, पुणे कार्यालयाचे पत्र क्र.ह-भाषा-भाषेतर /४०२१, दि.३१.१२.२०२०.

उपरोक्त संदर्भाधीन विषयांन्वये, सन २०२०-२१ पासून इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृह्शास्त्र या विषयाच्या पुनर्रचित पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

संदर्भ क्र.२ नुसार विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृह्शास्त्र या विषयाच्या पुनर्रचित पाठ्यपुस्तकांची निर्मिती बालभारती संस्थेकडून पूर्ण झाली असून सदर पाठ्यपुस्तकांच्या PDF प्रती पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharti.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच मूल्यमापन आराखडे , गुणदान योजना प्रात्यक्षिक /तोंडी/अंतर्गत गुणदान इ.कामकाजासाठी पाठविण्यात आल्या आहेत.

तरी शालेय वर्ष २०२०-२०२१ पासून इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी सदर विषयासाठी परीक्षा पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार घेण्यात येणार आहे.

तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ९ वी व १० वी साठी कार्यशिक्षण, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृह्शास्त्र या विषयांचा पाठ्यक्रम राज्यातील कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे शालेय

वर्ष २०२०-२१ साठी २५ % पाठ्यक्रम कमी करण्यात आला असून तो http://www.maa.ac.in या वेबसाईटवर दि.०४.०१.२०२१ रोजी देण्यात आला आहे.

तरी याबाबत आपल्या अधिनस्त असणा-या सर्व व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळांना आपले स्तरावरून अवगत करण्यात यावे.

(डॉ.विलास पाटील )
प्र. सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

- मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य ,पुणे.